जन संपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalwa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in ,
Contact No:- 9819208279

प्रेस नोट क्रमांक –

दिनांक – १३/०२/२०२५

गुन्हे शाखेकडुन चेन स्नॅचिंग, मोबाईल स्नॅचिंग व पोलीस बतावणीचे गुन्हे उघडकीस आणलेबाबत

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात चेन स्नॅचिंग, मोबाईल स्नॅचिंग व पोलीस बतावणीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी मा. वरीष्ठांनी सुचना व आदेश दिले होते, त्याप्रमाणे गुन्हे शाखा, घटक–२, भिवंडी यांचेकडुन सदरचे गुन्हे उघडकीस आणणेसाठी विशेष प्रयत्न चालु करण्यात आले होते. गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत यांना मिळालेल्या गुप्त बातमी व तांत्रिक विश्लेषणाचे आधारे आरोपी नामे रविंद्र धनाजी भोसले, वय २४ वर्षे, राह. मनपा शाळा क्र. ४३ चे बाजुला, देवाजीनगर, नारपोली, भिवंडी यास दि. ०४/०२/२०२६ रोजी कल्याण – भिवंडी बायपास, भिवंडी याठिकाणी सापळा रचुन शिताफीने ताब्यात घेण्यात आले असता त्याने भिवंडी, कल्याण, ठाणे, उल्हासनगर, कर्जत रेल्वे, पुणे रेल्वे हद्दीमध्ये **१३ चेन स्नॅचिंग व ३ मोबाईल स्नॅचिंगचे गुन्हे केल्याची कबुली दिली.** नमुद आरोपीत याने सदरचा माल दिनेश पांडुरंग पाटील, वय ४७ वर्षे, राह.पाटील नगर, माऊल कृपा चाळ, रू. नं. ०१, भास्कर, शाळेजवळ, आंबीवली, कल्याण याचेकडे विक्रीसाठी दिला असल्याचे सांगितले. नमुद दोन्ही आरोपींना भिवंडी शहर पोलीस स्टेशन गुरनं ४०२/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०९(४),३१७(२) मध्ये अटक करण्यात आलेली असुन, त्यांचेकडुन **५,६१,०००/– रु. किं. चे १५ तोळे ०६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २१ मोबाईल असा एकुण ८,५५,०००/– रु. किं. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.**

उघडकीस आलेले गुन्हे

१	भिवंडी शहर पो.ठाणे गु.र.नं.४०२/२०२५ बी.एन.एस.का.क.३०९(४),३१७(२) प्रमाणे.
२	भिवंडी शहर पो.ठाणे गु.र.नं.२०/२०२६ बी.एन.एस.का.क.३०४ प्रमाणे.
३	भिवंडी शहर पो.ठाणे गु.र.नं.११९४/२०२४ बी.एन.एस.का.क.३०९,३३३ प्रमाणे.
४	निजामपुरा पो.ठाणे गु.र.नं.७३६/२०२५ बी.एन.एस.का.क.३०९(४) प्रमाणे.
५	महात्मा फुले चौक पो.ठाणे गु.र.नं.१०२५/२०२५ बी.एन.एस.का.क.३०४(२)
६	कापुरबावडी पो.ठाणे गु.र.नं.६७८/२०२५ बी.एन.एस.का.क.३०९ (४) प्रमाणे.
७	बदलापुर पुर्व पो.ठाणे गु.र.नं.४५/२०२६ बी.एन.एस.का.क.३०९ (४) प्रमाणे.
८	मुंब्रा पो.ठाणे गु.र.नं. १२५६/२०२४ भादविक ३९२ प्रमाणे.
९	श्रीनगर पो.ठाणे गु.र.नं. ७६९/२०२४ भा.न्या संहिता का.क ३०९(४) प्रमाणे.
१०	कोपरी गु.र.नं.८०६/२०२५ भा.न्या संहिता का.क ३०९(४) प्रमाणे.
११	कर्जत रेल्वे पो.ठाणे गु.र.नं. ८६/२०२५ बी.एन.एस.का.क.३०४ (२) प्रमाणे.
१२	कल्याण रेल्वे पो.ठाणे गु.र.नं. ४४०/२०२५ बी.एन.एस.का.क.३०४ (२) प्रमाणे.
१३	पुणे रेल्वे पो.ठाणे गु.र.नं. ३४/२०२६ बी.एन.एस.का.क.३०४ (२) प्रमाणे.
१४	डोंबिवली रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ३६/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०३(२) प्रमाणे.
१५	डोंबिवली रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. २२१/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०३(२) प्रमाणे.
१६	बदलापुर पश्चिम पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. १७४/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०३(२) प्रमाणे.

तसेच पोलीस बतावणी करुन गुन्हे करणारे आरोपींचा तपास चालु असताना गुन्हे शाखेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शितल राऊत यांना मिळालेल्या गुप्त बातमीचे अनुषंगाने भिवंडी शहरात संशईत इसमांवर पाळत करीत असताना आरोपीत नामे मोहम्मद अजीज जाफरी रा. लोणी काळभोर, पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने भिवंडी शहरात **०२ बतावणीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.** नमुद गुन्हयातील मुद्देमाल त्याने श्रीकांत रामचंद्र गबाळे रा. मनेकल्ली, जि.बिदर, कर्नाटक राज्य यास विक्री केल्याचे सांगितले, त्याप्रमाणे नमुद दोन्ही आरोपींना अटक करण्यात येवुन त्यांचेकडुन **एकुण २,२०,०००/–रु किमतीचे ४५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.**

उघडकीस आलेले गुन्हे

१	शांतीनगर पो.ठाणे. गुन्हा रजि.क्र. ११०५/२५ बी.एन.एस का.क.३१८(४),२०४, ३(५),३१७(२) प्रमाणे.
२	नारपोली पो.स्टे. गुन्हा रजि.क्र. १२२७/२०२५ बी.एन.एस.का.क.३१८(४),३(५) प्रमाणे.

सदरची कामगिरी मा.डॉ.श्री.पंजाबराव उगले, अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे ठाणे शहर, मा.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे शहर, व मा. शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शोध – १, ठाणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक– २ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शितल राऊत, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, PSI/रविंद्र पाटील, PSI/राजेश शिंदे, PSI/रामचंद्र जाधव, ASI/श्री.सुधाकर चौधरी, ASI/श्री.सुनिल सांळुखे, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, पोहवा/४४९० निलेश बोरसे, पोहवा/६९७३ सुदेश घाग, पोहवा/८३८ साबीर शेख पोहवा/४३५५ राजेश गावडे, पोहवा/५५३४ किशोर थोरात, पोहवा/६९६० वसंत डोंगरे, पोहवा/४५४६ प्रकाश पाटील, पोहवा/१३५४ शशिकांत यादव, पोहवा/१९१३ रंगनाथ पाटील, पोहवा/४६३३/एस.एन. मुर्तडक, मपोहवा/६८३३ माया डोंगरे, मपोहवा/६८०० दक्षता सुतार, मपोहवा/६७४० अनुष्का पाटील, मपोना/७४९४ सायली गंभेरा, पोशि/१९९७ अमोल इंगळे, पोशि/७६८९ भावेश घरत, पोशि/७७०० विजय कुंभार, पोशि/६२८३ नितीन नंदीवाले, पोशि/८२६३ सर्फराज तडवी, चालक पोशि/२०९३ रविंद्र साळुंखे यांनी केली आहे.

———oooo———